# जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे (पुणेशहर)

(कलम ४ (१)(ब) नुसार स्वयंप्रेरणेने करावयाचे प्रकटन)

## कलम २ एच नमुना अ

माहितीचा अधिकार अधिनियम **२००५** अन्वये विभागवार लोकप्राधिकारी यांची यादी.

**शासकीय विभागाचे नाव :-** सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय,मुंबई

| अ.क्र. | लोक प्राधिकारी संस्था | संस्था प्रमुखाचे पदनाम | ठिकाण/पत्ता |
|---|---|---|---|
| | **निरंक** | | |

## कलम २ एच नमुना (ब)

शासनाकडून पूरेसा निधी प्राप्त लोकप्राधिकारी संस्थांची यादी

**शासकीय विभागाचे नाव :-** सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय,मुंबई

| अ.क्र. | लोक प्राधिकारी संस्था | संस्था प्रमुखाचे पदनाम | ठिकाण/पत्ता |
|---|---|---|---|
| | **निरंक** | | |

## कलम ४ (१) (ड)(।)

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे **शहर** कार्यालयातील रचना कार्य व कर्तव्ये यांचा तपशील

**१.कार्यालयाचे नाव** :- जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणेशहर

**२.पत्ता** :- साखर संकुल, शि वाजीनगर, पुणे – ४११००५.

**३.कार्यालय प्रमुख** :- जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणेशहर

**४.शासकीय विभागाचे नाव** :- सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय,मुंबई

**५.कोणत्या मंत्रालयातील खात्याच्या अधिनस्त्** :- सहकार

**६.कार्यक्षेत्र** :- पुणे शहरातील पुणेशहर व पिंपरी चिंचवड कार्यालये १ ते ६ ६ .

**७.विशिष्ट कार्ये** :- नोंदणी (ड नोंदवही) महाराष्ट सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५२ अ अन्वये अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय देणे .

**८.विभागाचे ध्येय / धोरण** :- सहकार चळवळीची निकोप वाढ

**९. धोरण** :- सहकारी संस्थाचे नियंत्रण व मार्गदर्शन

**१०.सर्व संबंधित अधिकारी** :- (जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणेशहर यांचे अधिनस्त् जिल्हयातील सहकार खात्यातील शासकीय अधिकारी व कर्मचारी )सोबत तक्ता जोडला आहे.

**कार्ये** :- १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१,

२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४,

३. महाराष्ट्र सावकारी नियमन अधिनियम २०१४

४. मुंबई वखार कायदा १९५९ व नियम १९६०

५. महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकाबाबत अधिनियम १९६३.

**११.कामाचे विस्तृत स्वरूप** :- सहकार चळवळीची गुणात्मक वाढ करून समाजाचा लोकशाही मार्गाने विकास साधणे.

**१२.मालमत्तेचा तपशील** :- **कार्यलयीन जागा भाडेतत्वावर आहे. (मा.विभागीय सहनिबंधक, यांचे नियंत्रणाखाली ) कार्यालयीन फर्निचर/संगणक इ.**

**१३.उपलब्ध सेवा दूरध्वनी क्रमांक :-** -(०२०) २५५३७६१७.

**१४.कार्यालयीन कामकाजाची वेळ** :- सकाळी १०.०० वा. ते ०५.४५

**१५.साप्ताहिक सुटटी व विशिष्ट सेवेसाठी ठरविलेल्या वेळा :-** (दुसरा व चौथा शनिवार)रविवार व शासनाने वेळोवेळी जाहीर केलेल्या सुटटया.

**१६.टपाल स्विकारण्याच्या वेळा** :- सकाळी १०.०० वा. ते ०५.४५ पर्यत.

**१७.कॅल्हेट व लेखी म्हण्णे** :- कार्यालयीन वेळेत

**१८.अपील अर्जावर लावण्यात येणारे कोर्ट स्टॅप फी :-**

| | |
|---|---|
| १. अपील अर्ज | रु.१००/- |
| २. स्थगिती अर्ज | रु.२५/- |
| ३. विलंबात सुट मिळणेसाठी अर्ज बिगर वाटी/प्रतिवादी यांचा | रु.२५/- |
| ४. परवानगी अर्ज | रु.५०/- |
| ५. वकालतनामा | रु.५/- |
| ६. कॅव्हेट | रु.२५/- |

**१९.माहिती अधिकार :-**

| | |
|---|---|
| १. अर्ज | रु.१०/- |
| २. प्रथम अपिल | रु.२०/- |

**या कार्यालयाच्या वैधानिक कार्यक्षेत्रामध्ये दि.३१/०३/२०१७ अखेर एकुण १८४१९ सहकारी संस्था आहेत. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था पुणेशहर यांच्या अधिनस्त एकूण ०६ क्षेत्रीय कार्यालय आहेत. त्याचे नियंत्रणाखाली सहकारी संस्थांचे प्रशासनीक/वैधानिक कामकाज केले जाते.**

**२] अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था पुणे शहर यांच्या अधिनस्त असणाऱ्या सर्व अधिकारी यांच्या जबाबदाऱ्या :-**

१) सहकारी संस्था व उपविधी नोंदणी (d.९) आणि त्याच्या सुधारणा (क.१३ व १४) यांची नोंदणी करणे आणि नोंदणीचे प्रमाणपत्र देणे (क.१०)

२) सदस्य होऊ पाहणारा इसम शेतकरी आहे किंवा नाही किंवा त्यांचे राहण्याचे ठिकाण संस्थेच्या कार्यक्षेत्रात आहे किंवा नाही याचा निर्णय देणे. (क.११)

३) संस्थेच्या वर्गीकरण करणे आणि त्यांची प्रसिध्द करणे (क.१२) (क.१३ (२) उपविधी सुधारणा नोंदणी स्वीकारणे, १३(३) उपविधीची सुधारणा नोंदणी नाकारणे, आणि उपविधी सुधारणा करण्याचा निर्देश देणे (क.१४)

४) संस्थेच्या नाव बदलास मंजुरी देणे(क.१५)

५) संस्थाचे एकीकरण, हस्तांतरण्,विभागणी किंवा रुपांतर यांस मंजुरी देणे (क.१७)

६) संस्थांचे एकीकरण किंवा पुनर्रचना करण्याचा निर्देश देणे (क.१८)

७) संस्थेची पुर्नरचना करण्याचा आदेश देणे (क.१९)

८) संस्थेच्या भागीदारीस परवानगी देणे (क.२०)

९) एखादया संस्थेच्या सदस्य् म्हणुन दाखल करुन घेण्यास नकार देण्यात आलेल्या व्यक्तीने केलेले अपील निकालात काढणे . (क.२३)

१०) सदस्याची संस्थेतुन हकालपटटी करण्याचे ठरावास मान्यता देणे किंवा सदर सदयास पुन:सदस्य् म्हणुन दाखल करुन घेण्यास संमती देणे (क.३५)

११) दुसऱ्या संस्थेस कर्ज देण्यास संमती देणे. (क.४४)

१२) संस्थेचा निधी विशिष्ठ रीतीने गुंतविण्यासंबंधी आदेश देणे (क.७०)

१३) एखादया संस्थेच्या किंवा संस्था वर्गाच्या समितीवरील सदस्यांची कमाल संख्या निश्चित करणे(क.७३)

१४) अधिसुचित विनिर्दिष्ट संस्थेच्या निवडणुका घेणे व निवडणुक घेण्याचा खर्च विहित रीतीने वसुल करणे (क.७३ ए क क)

१५) मुदत संपण्यापुर्वी समितीने निवडणुक न घेतल्यास निबंधक स्वत:च संस्थेचे व्यवस्थापन आपल्याकडे घेता येईल किंवा प्रशासकाची नेमणुक करता येईल(क.७३ ह)

१६) संस्थेची किंवा संस्था वर्गाचा मुख्य कार्यकारी अधिकारी,वित्त् अधिकारी,व्यवस्थापक,सचिव,वित्तलब्धी व वेतनेत्तर परिलब्धी निधारीत करणे (क.७४)

१७) वार्षिक सर्वसाधारण सभा बोलविण्यात किंवा तिचेपुढे ताळेबंद वगैरे ठेवण्याच्या बाबतीत कसुन करणारा (क.७५) किंवा विशेष साधारण सभा बोलविण्यात कसुर करणारा (क.७६) अधिकारी किंवा समितीचा यांस निवडणुकीस अपात्र ठरविणे किंवा असा अधिकारी संस्थेचा नोकर असल्यास त्यास रु.१००/- पर्यत दंड करणे.

१८) वार्षिक सर्वसाधारण बोलविणे किंवा ती बोलविण्याचा एखादया इसमास अधिकार देणे (क.७५).

१९) संस्थेची विशेष् सर्वसाधारण बोलविणे किंवा ती बोलविण्याचा एखादया इसमास अधिकार देणे(क.७६).